राज्य शासकीय कर्मचारी/अधिकारी यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अनुज्ञेय करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय,लेखा व कोषागारे,

कस्तुरी इमारत, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.
दुरध्वनी क्र. ०२२-२२८८०१०६/७ ई-मेल - admin-dat@mah.gov.in

वाचा -

१.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र,एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५
२.शासन निर्णय, वित्त विभाग क्र.११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दि.२०.०७.२००१
३.शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन २००२/प्र.क्र.१/सेवा-३, दि.११.०१.२००२
४.शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३, दि.३१.०८.२००९
५.शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३, दि.०१.०४.२०१०
६.शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३, दि.०१.०७.२०११
७.शासन निर्णय, वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३, दि.१९.०१.२०१३
८.शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३, दि.०९.१२.२०१६
९.शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि.२३.१२.२०१५
१०.शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.०८/सेवा-३, दि.११.०५.२०१७
११. शासन निर्णय,वित्त विभाग, क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दि.०२.०३.२०१९
१२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२,दि.०१.०८.२०१९
१३. वित्त विभागाचे पत्र क्र.वेतन-२०१९/प्र.क्र.१२५/सेवा-३, दि.१०.१२.२०१९
१४. वित्त विभागाचे पत्र क्र.वेतन-१९९९/प्र.क्र.३/सेवा-३, दि.०१.११.२०२०
१५. वित्त विभाग शासन आदेश् क्र. संलेको.२०२०/प्र.क्र.१५६/कोषा.प्रशा.-२, दि. २४.११.२०२१
१६. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/२०२२/प्रशा-राप/सुसेआप्रयो/सहा.संचा/१६९५, दि.१२.१२.२०२३
१७.संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/२०२२/प्रशा-राप/सुसेआप्रयो/सहा.संचा/१३३४, दि.२५.१०.२०२४
१८. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/२०२२/प्रशा-राप/सुसेआप्रयो/सहा.संचा/६०३, दि.१६.०६.२०२५

क्र.संलेको २०२५/प्रशा-राप/सुसेआप्रयो/सहा.संचा/६९४ दिनांक :- 17 JUL 2025

## -: आदेश :-

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचारी/अधिका-यांना१०,२० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वित्त विभागाच्या दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयामधील नमूद तरतुदीनुसार, सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बॅड रु.१५६००-३९१०० व ग्रेड पे रु. ५४००/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी/अधिकाऱ्यांना लागू राहील. संबंधित कर्मचारी/अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरीत करु लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

तथापि महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक संवर्गातील जे अधिकारी सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० या वेतनस्तरामध्ये वेतन आहरीत करतात, त्यांचे पुढील पदोन्नती साखळीतील पद उपसंचालक असून ते एस-२३ या वेतनस्तरामध्ये येते. याबाबत शासन वित्त विभागाने दि.०२.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये "सहायक संचालक पदावरील अधिका-यास विद्यमान एस-२० या वेतनस्तरानंतर पदोन्नतीच्या साखळीत (In Promotional Hierarchy) एस-२३ या वेतनस्तरामध्ये उपसंचालक हे पद असल्याने, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पात्रता आजमवल्यानंतर, पात्र ठरत असल्यास, संबंधितास वेतनस्तर एस-२३ मध्ये अनुज्ञेय लाभ मंजूर करता येईल". अशी मान्यता दिलेली आहे.

राज्य सेवा परीक्षा- १९९६ च्या तुकडीतील दि. ३१.१०.२०१० रोजीच्या आदेशान्वये सहायक संचालक संवर्गात तदर्थ पदोन्नती देण्यात आलेले श्री.नागसेन श्रीधर बागडे यांची तदर्थ पदोन्नती वित्त विभागाच्या दि. २४.११.२०२१ रोजीच्या आदेशान्वये दि.०१.०९.२०१३ रोजी सहायक संचालक पदावर नियमित करण्यात आली आहे.

श्री. नागसेन बागडे यांची लेखा अधिकारी पदावरील सलग सेवा विचारात घेवून त्यांना प्रथम जुन्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार लेखा अधिकारी संवर्गातील १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर दि.०१.०२.२०११ रोजी पहिला लाभ अनुज्ञेय करण्यात येत आहे.

श्री. नागसेन बागडे,सहायक संचालक यांना अनुज्ञेय करण्यात आलेल्या पहिल्या लाभानंतर, नवीन तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत (१२+८= २०) उपसंचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय करणेसाठी श्री.बागडे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०१.०८.२०१९ व दि.०१.०२.२०२० आणि वित्त विभाग शासन निर्णय दि.०२.०३.२०१९ मधील अटी व शर्तीची पूर्तता करीत आहेत. त्यानुसार श्री. नागसेन बागडे यांना नवीन तीन लाभांच्या योजनेंतर्गत उपसंचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ हा शासकीय सेवेतील दुसरा लाभ म्हणून पात्रतेनुसार पुढील तक्त्यात नमूद केल्यानुसार त्यांचे नावासमोरील स्तंभ ९ मधील नमूद दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | लेखा अधिकारी संवर्गातील रजू दिनांक | सहायक संचालक संवर्गातील तदर्थ पदोन्नतीच्या पदावरील रजू दिनांक | ले.अ. पदावर १२ वर्षे नियमित सेवा पूर्ण झाल्याचा दिनांक | सहायक संचालक संवर्गातील तदर्थ पदोन्नती नियमित केल्याचा दिनांक | सु.स.आ.प्र. योजनेंतर्गत सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा पहिला लाभ अनुज्ञेय केल्याचा दिनांक | १२ +८ = २० वर्षे नियमित सेवा पूर्ण केल्याचा दिनांक | तीन लाभांच्या योजनेंतर्गत उपसंचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा दुसरा लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | श्री नागसेन. श्रीधर बागडे | ०१.०२.१९९९ | ३०.०६.२०१० | ०१.०२.२०११ | ०१.०९.२०१३ | ०१.०२.२०११ | ०१.०२.२०१९ | ०१.०२.२०१९ |

**अटी व शर्ती -:**

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.०८.०६.१९९५ मधील अट क्र. २ (मा) : या योजनेंतर्गत अनुज्ञेय करण्यात आलेल्या लाभामुळे संबंधित अधिका-यांच्या जबाबदारी आणि कर्तव्यामध्ये वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. या योजनेंतर्गत वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतननिश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल. मात्र त्याच वेतन संरचनेत नियमित/ कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२. शासन निर्णय वित्त विभाग दि.०२.०३.२०१९ मधील अट क्र.(xx) (३) : या योजनेंतर्गत पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही. तसेच असे

लाभ काढून घेतल्यानंतर संबंधिताची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतूदीनुसार करण्यात येईल.

३. शासन निर्णय वित्त विभाग दि.०२.०३.२०१९ मधील अट क्र.(xx) (२) : कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी / अधिकारी यांस भविष्यात होणाऱ्या / झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर, अन्य विहित अटी व शर्तीच्या पूर्ततेनंतर, या योजनेअंतर्गत यथास्थिती पहिला / दुसरा / तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

४. या आदेशान्वये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यांत आलेल्या अधिका-यांनी शासन निर्णय, वित्त विभाग पीएवाय-१०८२/सीआर/११००/(एक)/एसईआर-३, दिनांक ०६.११.१९८४ व वित्त विभाग, शासन परिपत्रक वेपूर -२०१९/ प्र.क्र.८ /सेवा-९, दि.२०.०२.२०१९ नुसार वेतन निश्चितीचा विकल्प द्यावयाचा असल्यास तो त्यांनाी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावा.

५. संबंधित कार्यालय प्रमुखांनी वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेतील वेतन निश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करुन त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून अनुज्ञेय वेतनस्तरामध्ये देण्यात यावा. तसेच उपरोक्त अधिकाऱ्यांना सदर योजनेचा पहिला लाभ अनुज्ञेय होण्यापूर्वी ते वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन आहरीत करीत असल्याने वेतनिश्चिती करताना समायोजन करण्याची दक्षता घेणेत यावी.

६. सदरचे आदेश संचालनालयाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीसाठी कार्यालय प्रमुख यांनी www.mahakosh.gov.in या संकेतस्थळावरील प्रत ग्राह्य धरावी.

(दीपा देशपांडे)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-

१. सहसचिव, वित्त विभाग,मंत्रालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई ४०० ०३२
२. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
३. सहसंचालक, लेखा व कोषागारे (सर्व)
४. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
५. आदेशातील नमूद अधिकाऱ्यांचे विभाग प्रमुखर व कार्यालय प्रमुख यांनी सुधारीत वेतननिश्चितीबाबतची आवश्यक ती कार्यवाही करुन फरकाची रक्कम प्रदान / वसूल (लागू असेल ते) करावी.
६. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालये (सर्व)
७. संबंधीत अधिकारी यांना त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत.
८. गोपनीय अहवाल कक्ष, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई
९. संबंधित अधिकारी यांची वैयक्तिक नस्ती.
१०. निवड नस्ती.